**प्रेस नोट दि.१७/०७/२०१९**
**फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे**
**गुन्हयांत पाहिजे असलेल्या आरोपीस अटक केले बाबत.**

आज रोजी आम्ही आमचे कार्यालयात काम करीत असताना मा.पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ १, पुणे शहर यांचे कार्यालयातील कामकाज करणारे पोलीस नाईक ६२८ पालवे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, फरासखाना पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं २८५/२०१७, भा.दं.वि.कलम ३९२,३६६,३७०(२),३७०(अ)(२),३४४,१०९,३४, सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ क. ३,४,५,६,७ मधील पाहिजे आरोपी नामे नंदा गोविंद डोंग, ही न्यु सागर बिल्डींग, बुधवार पेठ, पुणे. येथे आले असलेबाबत माहिती मिळाल्याने सदरची बातमी आम्ही स्वतः वरिष्ठांना सांगितली. त्याप्रमाणे वरिष्ठंना आम्हांस बातमीचे ठिकाणी जावुन खात्री करुन सदर पाहिजे महिला आरोपी हिस ताब्यात घेणेबाबत सांगितले. त्याप्रमाणे आम्ही स्वतः तसेच म.पो.हवा. गोसावी, पो.ना. पालवे, पो.ना.जगदाळे, पो.शि. गायकवाड, पो.शि. साळुंखे असे मा.पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ १, पुणे शहर यांचे आदेशाने वरील ठिकाणी अचानकपणे छापा टाकला असता न्यु सागर बिल्डींग,पहिला मजला, बुधवार पेठ, पुणे. येथील घर चेक केले असता सदर घरामध्ये पाहिजे आरोपी नंदा गोविंद डोंग, वय- ५२ वर्षे,रा. सिध्दार्थनगर, स.नं. ५/६, परेल पल्लुउद्दीन, बी बिल्डींग, फ्लॅट नं ३, पिंपरी, पुणे. मुळगाव- मु.पो. बहुदा, पोस्ट- झोडपट्टी, देश- नेपाळ. ही मिळुन आल्याने तिस महिला पोलीस कर्मचारी यांचेकरवी ताब्यात घेण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ १, पुणे शहर. यांचे मार्गदर्शनाखाली श्री. किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे., तसेच म.पो.हवा.गोसावी,पो.ना.पालवे,पो.ना.जगदाळे,पो.शि.गायकवाड,पो.शि.साळुंखे यांनी केलेली आहे.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे.